सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. समिती-०६२५/प्र.क्र.७९/विशा-९ दि. २५ जून,२०२५.

**विषय :-** शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० मधील तरतुदींचा नवीन फौजदारी कायद्यांशी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. समिती-०६२५/प्र.क्र.७९/विशा-९,दि.२५ जून,२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६२५१८१८३०२७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 27-06-2025 17:18:02

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :-

पोलीस महासंचालक यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० मधील तरतुदींचा नवीन फौजदारी कायद्यांशी तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समिती-०६२५/प्र.क्र.७९/विशा-९**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०२५.

**वाचा:-**

गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ०२.०७.२०२४ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाने भारतीय दंड संहिता, १८६० व फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ हे दोन कायदे निरस्त केले असून भारतीय न्याय संहिता, २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ हे नवीन कायदे दिनांक १ जुलै २०२४ रोजी पासून अंमलात आले आहेत. सबब, शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० (वि.स.वि.क्र.५१) तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० (वि.स.वि.क्र.५१) तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ३ | सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ४ | अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ५ | उप सचिव (विधि), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य सचिव |

२. सदर समितीची कार्यकक्षा व जबाबदारी खालीलप्रमाणे असेल.

i. शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० (वि.स.वि.क्र.५१) तसेच भारतीय न्याय संहिता, २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

ii. नव्याने लागू झालेल्या भारतीय न्याय संहिता, २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील तरतुदींचा अभ्यास करून महिला व बालके यांच्या संरक्षणासाठी अधिक कायदेशीर तरतुदी आवश्यक असल्यास त्याबाबत शासनास शिफारस करणे.

iii. समिती आपला अहवाल शासनास २ महिन्यांत सादर करेल.

iv. समितीला आवश्यकतेनुसार संबंधित विषयाच्या तज्ञ व्यक्तीस / अधिका-यांस आमंत्रित करण्याची मुभा राहील.

३. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०६२५१८१८३०२७२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAYSEN JAYPRAKASH INGOLE

Digitally signed by JAYSEN JAYPRAKASH INGOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=fac1868a3a3bc62404072a90fb604cfa54cc0c6b396bbe9f862cb814602e0bfd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7C9E48AC69F313DEECCD6E9EECEEA57A822C9D8CCACD64DD1C5031B045E7C1F2, cn=JAYSEN JAYPRAKASH INGOLE
Date: 2025.06.25 18:19:52 +05'30'

**( जयसेन इंगोले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (गृह/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (गृह/शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (गृह), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
१३. अपर पोलीस महासंचालक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. निवड नस्ती (विशा-९).